दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २९७ । गुरुवार २७ ऑगस्ट २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainikaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## शहरात मावा बनविणाऱ्या दोन कारखान्यांवर कारवाईत सव्वाचार लाखांचा मुद्देमाल जप्त

**एलसीबीची कारवाई । पाचजणांवर गुन्हे, एकजण फरार**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने २७ ऑगस्ट रोजी मावा व सुगंधित तंबाखू बनवणाऱ्या नगर शहरातील दोन कारखान्यांवर कारवाई करून एकूण ४ लाख ३९ हजार ४८६ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात ५ जणांविरुद्ध २ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

शहरात अवैध गुटखा आणि मावा विक्री करणाऱ्यांची माहिती काढून एलसीबीच्या पथकाने दोन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकले. पहिल्या कारवाईत आरोपी आदेश किसन भिंगारदिवे (वय २३, रा. भिंगारदिवे मळा, गांधीनगर, बोल्हेगाव) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला, तर दुसऱ्या कारवाईत कृष्णा यादव वैराळ (वय ३४, रा. सर्जेपुरा), मोसीम रफिक शेख (वय ३८, रा. मुकुंदनगर) आणि वसीम रफिक शेख (वय ३२, रा. मुकुंदनगर) यांना ताब्यात घेण्यात आले असून राकेश सब्बन (रा. दातरंगे मळा) हा आरोपी फरार आहे. सर्व आरोपींवर भारतीय न्याय संहितेच्या कलम १२३, २२३, २७४, २७५ व ३(५) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**पथकात यांचा सहभाग**

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार अरुण गांगुर्डे, विकास साळवे, गणेश धोत्रे, योगेश भिंगारदिवे, संदीप पवार, विजय ठोंबरे, अतुल लोटके, शाहीद शेख, अभिजित आरकल, सतीश भवर तसेच महिला पोलीस अंमलदार चिमा काळे व सुनिता पवार यांच्या दोन स्वतंत्र पथकांनी ही कारवाई केली.

## एलसीबीचे तत्कालीन पीआय कबाडींची बदलीविरोधातील याचिका ‘मॅट’ने फेटाळली

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे (एलसीबी) तत्कालीन पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी बदलीच्या विरोधात मॅटकडे दाखल केलेली याचिका फेटाळण्यात आली आहे. कबाडींची शिर्डी येथे झालेली बदली कायम ठेवण्याचा निर्णय देण्यात आला आहे. नगरचे यापूर्वीचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या कार्यकाळात कबाडी यांची एलसीबीचे पोलीस निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यावेळी कबाडी हे नियंत्रण कक्षात पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत होते. दरम्यान, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची चार महिन्यांपूर्वी बदली होऊन त्यांच्या जागी नवे पोलीस अधीक्षक म्हणून मुम्मका सुदर्शन यांनी दिनांक १ मे रोजी सूत्रे हाती घेतली. सुदर्शन यांनी पोलीस दलात अनेक धडाकेबाज निर्णय घेतले. विशेषतः पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांमध्ये त्यांनी केलेल्या



फेरबदलांनी खळबळ उडवून दिली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षकपदी कार्यरत असलेले किरणकुमार कबाडी यांची सुदर्शन यांनी शिर्डी येथे साई मंदिर सुरक्षा विभागात बदली केली. अवघ्या दहा महिन्यांपूर्वी नियुक्ती झालेल्या कबाडी यांची झालेली बदली पोलीस वर्तुळात चर्चेचा विषय ठरला. नगर जिल्ह्यात एक वर्षाच्या आत बदली झालेले किरणकुमार कबाडी हे एलसीबीचे पहिलेच पोलीस निरीक्षक ठरले. त्यांच्या जागी शेवगाव येथे कार्यरत असलेले संतोष मुटकुळे यांच्या हाती एलसीबीची सूत्रे देण्यात आली. या पार्श्वभूमीवर किरणकुमार कबाडी यांनी बदलीच्या विरोधात महाराष्ट्र प्रशासकीय ■ पान ४ वर

**ड्रग्ज चोरी प्रकरण ठरले कळीचे**

किरणकुमार कबाडी यांच्या कार्यकाळात या वर्षाच्या सुरुवातीला एक मोठे प्रकरण उजेडात आले होते व या बदलीच्या याचिकेतही त्याचा उल्लेख आलेला आहे. एलसीबीच्या कस्टडीत असलेले सुमारे तीन कोटींचे ड्रग्ज मुख्यालयातून चोरीला गेले होते. या प्रकरणाचा छडा पुणे ग्रामीण एलसीबीने लावला होता व त्याचे धागेदोरे थेट नगरच्या एलसीबीपर्यंत पोहचले होते. त्यामुळे मोठी खळबळ उडून हा राज्यात चर्चेचा विषय ठरला होता. हेच प्रकरण कबाडींना भोवल्याचे सांगितले जात आहे.

## पारनेर व नगर तालुक्यात दहशत माजवणारी शिंदे टोळी तडीपार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पारनेर आणि नगर तालुका परिसरात दहशत निर्माण करून शरीराविरुद्ध व मालाविरुद्ध गंभीर स्वरूपाचे गुन्हे करणाऱ्या शिंदे टोळीतील प्रमुखासह तीन सदस्यांना एका वर्षाकरिता अहिल्यानगर जिल्ह्यातून तडीपार करण्याचे आदेश जारी करण्यात आले आहेत. नगर तालुका आणि सुपा पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरी करणे, रस्ता अडवून मारहाण करणे, मालमत्तेचे नुकसान करणे, जीवे मारण्याची धमकी देणे, खुनाचा प्रयत्न करणे आणि बेकायदेशीरपणे घातक शस्त्रे बाळगणे यांसारखे अनेक गंभीर गुन्हे या टोळीवर दाखल आहेत. या गुन्हेगारी कारवायांमुळे सामान्य नागरिक व व्यापाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर भीतीचे वातावरण पसरले होते.

या सराईत गुन्हेगारांवर वचक बसवण्यासाठी सुपा पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांनी हद्दपारीचा प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावाची सखोल चौकशी केल्यानंतर, पोलीस प्रशासनाने टोळीप्रमुख अतुल विश्वनाथ शिंदे, टोळी सदस्य अरुण शिवाजी गवळी आणि ■ पान ४ वर

## शिक्षकांच्या रिक्त पदांवरून खा. नीलेश लंके आक्रमक

**१ सप्टेंबरपासून उपोषण । २,५२५ शिक्षकांची पदे रिक्त असल्याचा दावा । ३१ ऑगस्टपर्यंत निर्णय घेण्याची जिल्हा परिषद प्रशासनाला मुदत**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे तातडीने भरावीत, शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा वाढता भार कमी करावा आणि शिक्षकांच्या कमतरतेमुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान थांबवावे, या मागणीसाठी खासदार नीलेश ज्ञानदेव लंके यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. या मागण्यांवर ३१ ऑगस्टपर्यंत ठोस निर्णय व लेखी कृती आराखडा न मिळाल्यास १ सप्टेंबर पासून जिल्हा परिषद आवारात उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

खासदार लंके यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांना दिलेल्या पत्रात जिल्ह्यातील शिक्षकांच्या रिक्त पदांचा प्रश्न गंभीर असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. उपलब्ध अधिकृत आकडेवारीनुसार प्राथमिक व पदवीधर शिक्षक संवर्गातील ४७१, तर माध्यमिक विभागातील २ हजार ५४ पदे अशी एकूण २ हजार ५२५ शिक्षकांची पदे रिक्त असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. प्रत्येक शिक्षकामागे २० विद्यार्थी गृहीत धरल्यास सुमारे ५० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर याचा परिणाम होत असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

एकीकडे हजारो शिक्षकांची पदे रिक्त असताना कार्यरत शिक्षकांनाच अध्यापनाव्यतिरिक्त विविध अशैक्षणिक कामे करावी लागत असल्याकडे लंके यांनी लक्ष वेधले आहे. बीएलओ ड्युटी व मतदार यादी पुनरिक्षण, जनगणना व विविध शासकीय सर्वेक्षणे, ऑनलाइन पोर्टलवर माहिती भरणे, विद्यार्थ्यांचे आधार कार्ड व बँक खाती, पोषण आहार, एफएसएसएआय नोंदणी, आरोग्यविषयक नोंदी तसेच विविध योजनांचे अहवाल व ऑनलाइन कामे शिक्षकांवर सोपविली जात असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

शिक्षकांचा अध्यापनाचा वेळ अशा कामांमध्ये खर्च होत असल्यास विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण कसे मिळणार, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. शिक्षकांचा प्रश्न हा केवळ कर्मचारीविषयक प्रश्न नसून तो विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याशी थेट संबंधित असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

शिक्षकांची हजारो पदे रिक्त असताना ती भरण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली.

आवश्यक प्रस्ताव व पाठपुरावा वेळेत का करण्यात आला नाही, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीची जबाबदारी कोणाची, तसेच कार्यरत शिक्षकांवर पडलेल्या अतिरिक्त कामाच्या भाराची जबाबदारी कोणाची, असे प्रश्न लंके यांनी उपस्थित केले आहेत. शिक्षकांचा प्रत्यक्ष अध्यापनाचा वेळ आणि अशैक्षणिक कामांसाठी जाणारा वेळ याचा प्रशासनाने आढावा घेतला आहे का, याबाबतही त्यांनी खुलासा मागितला आहे.

जिल्ह्यातील सर्व रिक्त शिक्षक पदे तातडीने भरण्यासाठी अंतिम मुदतीसह कालबद्ध कृती आराखडा जाहीर करावा. प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील रिक्त पदांची शाळानिहाय, विषयानिहाय व संवर्गनिहाय अंतिम यादी जाहीर करावी. रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान व कार्यरत शिक्षकांवरील अतिरिक्त भाराचा तालुकानिहाय आढावा घेऊन लेखी ■ पान ४ वर




## नगरमध्ये रविवारी रंगणार ‘अहिल्यानगर फॅशन रनवे २०२६’चा मेगा इव्हेंट

**संस्कृती, परंपरा, आधुनिकता आणि स्त्रीशक्तीचा अनोखा संगम**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगरच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा गौरव, महिला सक्षमीकरण, आत्मविश्वास आणि स्त्रीशक्तीचा जागर करण्याच्या उद्देशाने आयोजित ‘अहिल्या सरस्वती महोत्सव २०२६’ अंतर्गत रविवार, दि. ३० ऑगस्ट २०२६ रोजी ‘अहिल्यानगर फॅशन रनवे’ या भव्य मेगा इव्हेंटचे आयोजन करण्यात आले आहे. नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉन्स येथे दुपारी २.३० वाजता हा कार्यक्रम रंगणार असून, नगरच्या सांस्कृतिक आणि फॅशन विश्वात नवा आयाम निर्माण करणारा हा सोहळा ठरणार आहे.

अहिल्यासरस्वती महोत्सव

सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या पुढाकाराने आणि महावीर ग्रुपचे (राजेश भंडारी) टायटल स्पॉन्सरशिप लाभलेल्या या कार्यक्रमाचे संचालन फॅशन कार्निवलच्या वतीने कल्लाकार कट्टा टीम करीत आहे. मागील महिनाभरापासून या कार्यक्रमाची जोरदार तयारी सुरू असून, नगरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता दोन टप्प्यांत ऑडिशन घेऊन मेगा इव्हेंटसाठी सहभागींची निवड करण्यात आली आहे. स्पर्धकांसह सुमारे ५०० जणांचा सहभाग या कार्यक्रमात राहणार आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांचा आणि देदीप्यमान कार्याचा जागर करतानाच महिला शक्तीचा गौरव करणारा हा महोत्सव ठरणार आहे. फॅशन रनवेच्या माध्यमातून विविध क्षेत्रांतील महिलांना आपला आत्मविश्वास, प्रतिभा आणि सक्षमता सादर करण्यासाठी भव्य व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

## वाळकीत ईद-ए-मिलादनिमित्त हिंदू-मुस्लीम एकतेचे दर्शन!




अहिल्यानगर - ईद-ए-मिलाद (मोहंमद पैगंबर जयंती) निमित्त वाळकी (ता. नगर) येथे मुस्लिम बांधवांनी उत्साहात ईद साजरी केली. या पवित्र सणाच्या निमित्ताने सामाजिक कार्यकर्ते विजय भालसिंग यांनी गावातील मुस्लिम समाजातील नागरिकांना गुलाबपुष्प देऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या. प्रेम, बंधुभाव आणि सामाजिक सलोख्याचा संदेश देणाऱ्या या उपक्रमातून वाळकी गावात हिंदू-मुस्लीम ऐक्याचे दर्शन घडले.ईद-ए-मिलाद हा मुस्लिम समाजासाठी अत्यंत महत्त्वाचा आणि पवित्र दिवस मानला जातो. मोहंमद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त मुस्लिम बांधवांकडून विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. वाळकी येथेही यानिमित्ताने उत्साहाचे वातावरण होते. गावातील मुख्य चौकात ईदच्या पार्श्वभूमीवर सजावट करुन प्रसाद वाटप देखील करण्यात आले. गावातील मुस्लिम समाजातील ज्येष्ठ नागरिक, युवक तसेच लहान मुलांची भेट घेऊन विजय भालसिंग यांनी त्यांना गुलाबपुष्प देत मनापासून 'ईद मुबारक' केले.या वेळी धार्मिक सणाच्या शुभेच्छांसोबतच सामाजिक एकोप्याचा संदेश देण्यात आला. विविध धर्म, जाती आणि पंथातील नागरिकांनी परस्परांच्या सण-उत्सवात सहभागी होऊन एकमेकांना शुभेच्छा दिल्यास समाजातील बंधुभाव अधिक दृढ होतो, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. यावेळी बब्बू पठाण, फारूख शेख, अलीम शेख, आझाद बेग, हानीफ शेख, फिरोज आत्तार, समी शेख, आयान पठाण, आतीक पठाण यांच्यासह भाजपचे गणेश भालसिंग आदी उपस्थित होते.विजय भालसिंग म्हणाले की, ''ईद-ए-मिलाद हा प्रेम, शांतता, बंधुभाव आणि मानवतेचा संदेश देणारा पवित्र दिवस आहे. आपल्या गावात सर्व समाजातील नागरिक अनेक वर्षांपासून एकोप्याने राहत आहेत. एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होणे आणि सण-उत्सवाच्या माध्यमातून आपले संबंध अधिक दृढ करणे, हीच आपल्या गावाची खरी परंपरा आहे.''ते पुढे म्हणाले, ''हिंदू असो किंवा मुस्लिम, प्रत्येक धर्म माणुसकी, प्रेम आणि शांततेचा संदेश देतो. सण वेगवेगळे असले तरी आपला माणुसकीचा धर्म एकच आहे. त्यामुळे ईदच्या निमित्ताने मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देताना आनंद होत आहे. आपल्या गावातील हिंदू-मुस्लीम ऐक्याची ही परंपरा अशीच पुढे सुरू राहावी, हीच सदिच्छा त्यांनी व्यक्त केली. ''तरुण पिढीने जात-धर्माच्या भिंतींपेक्षा मैत्री, बंधुभाव आणि राष्ट्रीय एकात्मतेला महत्त्व द्यावे. समाजात प्रेम आणि विश्वास वाढविण्यासाठी अशा छोट्या-छोट्या उपक्रमांची मोठी गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

## पंडिता रमाबाईच्या अनुवादित बायबलची दुर्मिळ प्रत ऐतिहासिक वस्तू संग्रहालयात!

अहिल्यानगर - स्त्रीशिक्षणाच्या अग्रदूत, विदुषी आणि समाजसुधारक पंडिता रमाबाई यांनी अनुवादित केलेल्या बायबलची सन १९२४ मध्ये प्रकाशित झालेली दुर्मिळ प्रत अहिल्यानगर येथील ऐतिहासिक वस्तू संग्रहालय व संशोधन केंद्रात कायमस्वरूपी जतनासाठी जमा करण्यात आली आहे. पंडिता रमाबाईची विद्वत्ता, त्यांचे भाषांतर कार्य तसेच स्त्रीशिक्षण आणि सामाजिक सुधारणांसाठी त्यांनी केलेल्या व्यापक कार्याची साक्ष देणारा हा ऐतिहासिक ग्रंथ संग्रहालयाच्या ठेव्यामध्ये महत्त्वाची भर ठरला आहे.सावेडी येथील रविंद्र प्रेमचंद ठोंबरे यांनी ही दुर्मिळ प्रत ऐतिहासिक वस्तू संग्रहालय व संशोधन केंद्राचे क्युरेटर डॉ. संतोष यादव यांच्याकडे स्वखुशीने संग्रहालयासाठी कायमस्वरूपी देणगी म्हणून सुपूर्द केली. त्यांनी २४ ऑगस्ट २०२६ रोजी यासंदर्भात संग्रहालयाच्या कार्यकारी विश्वस्तांकडे लेखी अर्ज दिला. त्यांच्या अर्जानुसार, ही प्रत पंडिता रमाबाई यांनी भाषांतरित केलेल्या पहिल्या शंभर प्रतींपैकी एक असून, सन १९२४ मध्ये प्रकाशित झालेली आहे. सदर ग्रंथाची संग्रहालयात आवक क्रमांक ४२५/२०२६, दि. २४ ऑगस्ट २०२६ अशी नोंद करण्यात आली आहे. हा ऐतिहासिक ग्रंथ सौ. किरण साळवी (सोलापूर) यांच्या नावाने जतन करून ठेवावा, अशी विनंतीही देणगीदारांनी केली आहे. पंडिता रमाबाईचा जन्म २३ एप्रिल १८५८ रोजी झाला. त्यांचे वडील अनंतशास्त्री डोंगरे हे संस्कृत व वेदशास्त्राचे विद्वान होते. त्या काळात महिलांना शिक्षणापासून, विशेषतः संस्कृत शिक्षणापासून दूर ठेवले जात असतानाही अनंतशास्त्री यांनी रमाबाईना संस्कृतचे शिक्षण दिले. रमाबाईनी संस्कृत भाषेवर असामान्य प्रभुत्व मिळविले. सन १८७८ मध्ये कोलकाता येथे त्यांच्या विद्वत्तेचा गौरव करण्यात आला आणि त्यांना 'पंडिता' तसेच 'सरस्वती' या पदव्या प्रदान करण्यात आल्या.

# शाळेने केलेला सन्मान आमच्यासाठी मातृसन्मानासारखा- शैलेश उपासनी

### दादा चौधरी विद्यालयानेच आम्हाला घडविले; राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त माजी विद्यार्थ्यांचा विद्यालयात भव्य सत्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** हिंद सेवा मंडळाच्या दादा चौधरी विद्यालयातील माजी विद्यार्थी तथा राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त पोलीस उपनिरीक्षक शैलेश उपासनी आणि अग्निशमन दलाचे प्रमुख गणपतराव मिसाळ यांचा विद्यालयाच्या वतीने नुकताच भव्य सत्कार करण्यात आला. विद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक, माजी विद्यार्थी, पालक आणि मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्याला जुन्या आठवणींना उजाळा देत भावनिक वातावरण निर्माण झाले.

यावेळी आपल्या आभार मनोगतात शैलेश उपासनी यांनी आपल्या जीवनातील यशाचे श्रेय दादा चौधरी विद्यालयाला आणि तेथील शिक्षकांनी दिलेल्या संस्कारांना दिले. ''दादा चौधरी विद्यालयानेच आम्हाला घडविले. आमच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत विद्यालयाचे योगदान अत्यंत मोठे आहे. याच विद्यालयात आमच्यात नेतृत्वगुण, वक्तृत्वकला, सामाजिक भान आणि शैक्षणिक प्रगतीची पायाभरणी झाली. शिक्षकांनी दिलेले संस्कार आणि शिकवण आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आम्हाला उपयोगी ठरली,'' असे उपासनी यांनी सांगितले.

गणपतराव मिसाळ यांनीही आपल्या मनोगतात विद्यालयाविषयीच्या भावना व्यक्त करताना सांगितले की, समाजातील अनेक ठिकाणी सन्मान मिळेल; मात्र आपल्या शाळेने केलेला सन्मान हा मातृसन्मानासारखा आहे. ''आम्ही याच शाळेत धाडस, कृतिशीलता आणि कोणत्याही कामात स्वतःला झोकून देण्याची वृत्ती शिकलो. वर्गात मागच्या बाकावर बसूनही आयुष्यात पुढे जाण्याची उर्मी आम्हाला याच शाळेतील संस्कारांनी दिली. आमची शाळा म्हणजे आमच्या सर्वांचे दुसरे कुटुंबच होते,'' असे मिसाळ यांनी भावनिक होत सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना मुख्याध्यापिका श्रीमती निर्मला भंडारी यांनी विद्यालय नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले. आजही विद्यालयात विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून विविध नाविन्यपूर्ण आणि विद्यार्थीप्रिय शैक्षणिक उपक्रम राबविले जात आहेत. या उपक्रमांना विद्यार्थ्यांची साथ आणि सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले. राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त या दोन्ही माजी विद्यार्थ्यांनी विद्यालयाचे नाव उज्ज्वल केल्याबद्दल त्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी आणि ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा यांनीही या विशेष सोहळ्यास आवर्जून उपस्थित राहून दोन्ही सत्कारमूर्तींना शुभेच्छा दिल्या. विशेष म्हणजे उपासनी आणि मिसाळ यांचे अनेक वर्गमित्र मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित होते. त्यामुळे जुन्या शालेय आठवणींना उजाळा मिळाला आणि विद्यालयातील वातावरणात आपुलकीचा स्नेहभाव निर्माण झाला.

# शाह विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** जायकवाडी येथील शाह विद्यालयातील १९९९ च्या दहावीच्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन २२ व २३ ऑगस्ट रोजी पुणे जिल्ह्यातील मावळ येथील एका रिसॉर्टमध्ये उत्साहात पार पडले. या वेळी विविध उपक्रमांसह सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. स्नेहसंमेलनासाठी शाह ग्रुप १९९९ च्या अध्यक्षा अर्चना काळे, सुभाष डांगे, सय्यद हमीद, धर्मेंद्र श्रीवास्तव, पत्रकार हारून शेख मनिष अग्रवाल , रमेश जामदार, सुनील राठी संदीप माने, प्रभाकर गलांडे,यांच्यासह अनेक माजी विद्यार्थी उपस्थित होते.

# सीमेवरील वीर जवानांसाठी अहिल्यानगरच्या बहिणींचे प्रेम; तब्बल ३ हजार राख्या सरहदवर रवाना

### लायन्स क्लब, लिओ क्लब व घर घर लंगर सेवा आणि भारतीय डाक विभागाचा पुढाकार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** देशाच्या सीमेवर कर्तव्य बजावत असलेल्या वीर जवानांप्रती रक्षाबंधनाच्या पवित्र पर्वानिमित्त कृतज्ञता, प्रेम आणि आपुलकी व्यक्त करण्यासाठी अहिल्यानगरमध्ये राबविण्यात आलेल्या 'दिल से सरहद तक' या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमांतर्गत अहिल्यानगर शहर व परिसरातील बहिणी, नागरिक, सामाजिक संस्था आणि शालेय विद्यार्थ्यांनी प्रेमाने उपलब्ध करून दिलेल्या तब्बल ३ हजार राख्या भारतीय डाक विभागाच्या माध्यमातून देशाच्या सीमेवर तैनात असलेल्या जवानांसाठी पोस्टाने रवाना केल्या.

लायन्स क्लब, लिओ क्लब आणि घर घर लंगर सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच भारतीय डाक विभागाच्या सहकार्याने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात विविध सामाजिक संस्था, नागरिक, व्यक्ती तसेच शालेय विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत राख्या उपलब्ध करून दिल्या. अहिल्यानगरमधील बहिणींनी प्रेमाने तयार केलेल्या या राख्या आता देशाच्या विविध सीमांवर कर्तव्य बजावणाऱ्या जवानांपर्यंत पोहोचणार आहेत.देशाच्या सुरक्षेसाठी आपल्या कुटुंबापासून हजारो किलोमीटर दूर राहून जवान अहोरात्र कर्तव्य बजावत असतात. बर्फाच्छादित प्रदेश असो, कडाक्याची थंडी असो किंवा प्रखर उन्हाचा सामना असो, प्रतिकूल हवामानातही जवान देशाच्या सीमेचे रक्षण करण्यासाठी सदैव सज्ज असतात. रक्षाबंधनाच्या दिवशी अनेक जवान आपल्या बहिणींपासून दूर असतात. त्यामुळे या जवानांना आपल्या बहिणींच्या प्रेमाची आणि आपुलकीची जाणीव व्हावी, तसेच 'देशवासीय आपल्या सोबत आहेत, आपण एकटे नाही' असा भावनिक संदेश मिळावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत पाठविण्यात आलेल्या प्रत्येक राखीसोबत जवानांसाठी शुभेच्छा संदेशही पाठविण्यात आला आहे. त्यामुळे राखीच्या माध्यमातून केवळ बहीण-भावाचे नातेच नव्हे, तर देशवासीय आणि देशरक्षक जवान यांच्यातील भावनिक नाते अधिक दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

# भक्ती म्हणजे संस्कार आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारी शक्ती - छायाताई फिरोदिया




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भक्ती म्हणजे केवळ देवाचे नामस्मरण नाही, तर आपल्या मनात चांगले विचार, संस्कार आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारी शक्ती आहे. आणि हीच भक्ती जेव्हा सुंदर स्वरातून व्यक्त होते, तेव्हा त्याला एक वेगळेच सौंदर्य प्राप्त होते. आजच्या या भक्ती गीत स्पर्धेत विद्यार्थ्यांना केवळ गाण्याची संधीच नव्हे तर आपल्या संस्कृतीशी, संत परंपरेशी आणि आपल्या समृद्ध अध्यात्मिक वारसाशी जोडले जाण्याची संधी मिळाली आहे. असे प्रतिपादन अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांनी केले.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय भक्ती सुमन स्पर्धेच्या बक्षीस वितरण प्रसंगी त्या बोलत होत्या. संस्थेच्या अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मिडीयम स्कूलच्या सभागृहात हि स्पर्धा संपन्न झाली. स्पर्धेचे उद्घाटन सकाळी दीप प्रज्वलन करून अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, विश्वस्त सुनंदा भालेराव, सुप्रसिद्ध गायक पवन श्रीकांत नाईक, माजी प्रथम क्रमांक विजेती स्पर्धक सरोज पालडिया यांनी केले. छोटा आणि मोठा अशा दोन गटात झालेल्या या स्पर्धेत ५० पेक्षा जास्त स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

सायंकाळी या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. धनश्री खरवंडीकर,संस्थेचे विश्वस्त ॲड.किशोर देशपांडे , ॲड. गौरव मिरीकर, सल्लागार भूषण भंडारी, मीनाताई बोरा, हेमंत मुथा यांसह भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे मुख्याध्यापक कैलास साबळे, रूपी बाई बोरा न्यू इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक रविकिरण भांड, अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मिडीयम स्कूलचे मुख्याध्यापक प्रभाकर भाबड,अध्यापक विद्यालय प्राचार्य संदीप उबाळे उपस्थित होते.

बक्षिस समारंभा प्रसंगी बोलताना छायाताई फिरोदिया म्हणाल्या की ,प्रत्येक सहभागी विद्यार्थी हा आजच्या स्पर्धेचा विजेता आहे. कारण व्यासपीठावर उभे राहून आत्मविश्वासाने सादरीकरण करणे हीच मोठी गोष्ट आहे. बक्षीस एखाद्याला मिळेल पण अनुभव आणि आत्मविश्वास प्रत्येकाच्या आयुष्यात कायमचा राहील. या स्पर्धेत कोण प्रथम येईल, कोण द्वितीय येईल यापेक्षा महत्त्वाचे आहे की, आपल्या प्रत्येकाच्या मनात भक्तीचा, संस्कारांचा आणि भारतीय संस्कृतीचा दीप अधिक तेजाने प्रज्वलित व्हावा. पुढील वर्षीपासून राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्याचा मानसही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी बोलताना डॉ. धनश्री खरवंडीकर म्हणाल्या की रिलच्या जमान्यात आपण आपली संस्कृती विसरत चाललो आहोत. प्रसिद्धी पेक्षा सिद्धी महत्त्वाची आहे. भक्ती गीत केवळ गाणे नाही तर जगण्याचे सार आहे.चांगला माणूस बनण्यासाठी संत साहित्य आणि अभंग आपल्याला प्रेरणा देत असतात. मुलांना सुरांकडे आणि संस्कारांकडे नेण्यासाठी अहमदनगर एज्युकेशन सोसायटीने आयोजित केलेली ही स्पर्धा निश्चितच कौतुकास्पद आहे.

स्पर्धेतील निकाल – छोट्या गटात प्रथम क्रमांक बेडेकर आरोही प्रसाद, द्वितीय क्रमांक नातू कौशिक प्रफुल्ल, तृतीय क्रमांक ढेपे स्वरूप अविनाश, उत्तेजनार्थ पळसकर अवनी समीर, परदेशी मुलांशू सुशील, म्हसे रिषभ योगेश यांनी सुयश संपादन केले.

मोठ्या गटात प्रथम क्रमांक कोरडे अथर्व रत्नाकर, द्वितीय क्रमांक कुलकर्णी ईरा अभिजीत, तृतीय क्रमांक कुलकर्णी वरदा धनंजय, उत्तेजनार्थ निसाळ तन्वीर चंद्रशेखर, लवलेकर आर्या सचिन, बोराडे श्रुती सुभाष यांनी यश संपादन केले.

विजेत्यांना सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र आणि रोख पारितोषिके देऊन गाौविण्यात आले. तर सर्व सहभागी स्पर्धकांचा संस्थेचे पदाधिकारी, शाळांचे मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व संगीत, सामाजीक तसेच सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते सन्मान आले. या स्पर्धेचे परीक्षण संभाजीनगर येथील गजानन केचे, मनिषा फणसळकर, विश्वनाथ दाशरथे आदी मान्यवर गायक – गुरूजनांनी केले .

# राज्यस्तरीय कुराश स्पर्धेमध्ये पै.मल्हार याला गोल्ड मेडल

### पंजाब येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** ऐतिहासिक अहिल्यानगर शहरातील वाडिया पार्क येथे नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र राज्य कुराश स्पर्धेमध्ये पै.मल्हार महेश सुरसे( वय १० वर्ष ) याने गोल्ड मेडल मिळवुन यशस्वी कामगिरी केली. या स्पर्धेतील यशस्वी कामगिरीमुळे पै. मल्हार सुरसे याची लुधियाना पंजाब येथे होणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.पै.मल्हार सुरसे याला प्रशिक्षक प्राध्यापक संजय धोपकर सर, आदित्य संजय धोपवकर यांचे मार्गदर्शन मिळाले, यांच्याच मार्गदर्शनाखाली आजपर्यंत पै.मल्हार सुरसे याने राज्यस्तरीय चार, जिल्हास्तरीय सहा पारितोषिके मिळवली यासह तीन गोल्ड मेडल आणि दोन सिल्वर मेडल मिळवले आहेत. पै. मल्हार याला धर्मनाथ घोरपडे सर, पै भाऊसाहेब धावडे वस्ताद ( भारतीय सैन्य प्रशिक्षक ) जय मल्हार आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुल अहिल्यानगर यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. दिल्ली गेट येथील एम एस कंट्रक्शन चे संचालक पै. श्री महेश सुरसे यांचा मल्हार हा मुलगा आहे. पै.मल्हार याच्या यशाबद्दल त्याचे हिंदू धर्म रक्षक आमदार संग्राम भैय्या जगताप यांनी पै. मल्हार याचा सत्कार करून त्याला शुभेच्छा दिल्या. मॉर्निंग ग्रुपचे शाम मुळे सर ( दिशा कॉम्प्युटर ) तसेच रोहित भाटिया, विकास जाधव, रोनक ओबेरॉय, रवी टीमकरे, मिथिलेश जी चौधरी, सॅम कॉम्प्युटरचे मनोज मुनोत, उमाकांत भांड, सनी शेठ धुप्पड, संग्राम घोरपडे, नरेंद्र रच्चा, विनायक नेवसे, विद्याविहार सोसायटीचे चेअरमन पत्रकार राजेंद्र येंडे, सेक्रेटरी शैलेश कुलकर्णी,कायझेन ग्राफिक्स चे संचालक विशाल येंडे यासह पै.महेश सुरसे मित्र परिवार यांच्या वतीने अभिनंदन केले तसेच पै.मल्हार याच्या पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# नारळी पौर्णिमेनिमित्त महर्षी मार्कंडेय महामुनींचा रथउत्सव; पालखी मिरवणुकीने अहिल्यानगर दुमदुमणार

### दिंडी, कोलालू, लेझीम, ढोल–ताशा व महिला फुगडी पथकांसह भव्य शोभायात्रेचे आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भक्ती, श्रद्धा आणि सामाजिक एकोप्याचा मंगल संगम घडविणाऱ्या नारळी पौर्णिमा उत्सवाचे आयोजन यंदा अहिल्यानगर येथे मोठ्या उत्साहात करण्यात आले आहे. पंच कमेटी पद्मशाली ज्ञाती समाज, श्री महर्षी मार्कंडेय देवस्थान ट्रस्ट आणि पद्मशाली विद्या प्रसारक मंडळ ट्रस्ट, अहिल्यानगर यांच्या संयुक्त सहकार्याने नारळी पौर्णिमा उत्सव २०२६ साजरा करण्यात येणार असून, या उत्सवाचे प्रमुख आकर्षण असलेला महर्षी मार्कंडेय महामुनी रथउत्सव व भव्य पालखी मिरवणूक भक्तिमय वातावरणात संपन्न होणार आहे.

नारळी पौर्णिमा हा पद्मशाली समाजाच्या धार्मिक व सांस्कृतिक परंपरेतील अत्यंत श्रद्धेचा उत्सव मानला जातो. या पवित्र पर्वानिमित्त महर्षी मार्कंडेय महामुनींच्या चरणी भक्तिभावाने नतमस्तक होण्याची आणि समाजबंधुत्वाची वीण अधिक घट्ट करण्याची संधी समाजबांधवांना मिळणार आहे. ''।। ॐ गणपतेय नमः ।। ॐ मार्कंडेय महामुनी नमः ।।'' या मंगल जयघोषाने उत्सवाचे वातावरण भक्तिरसाने भारून जाणार आहे.




उत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, रुद्राभिषेक, होमहवन आणि जाणव परिधान यांसारखे धार्मिक विधी होणार आहेत.

त्यानंतर महर्षी मार्कंडेय महामुनींचा रथउत्सव व पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत विविध पारंपरिक व सांस्कृतिक पथकांचा सहभाग राहणार असून, सोहम अकॅडमी चे मल्लखांब प्रात्यक्षिक, दिंडी पथक, कोलालू पथक, लेझीम पथक, तालयोगी चे ढोल–ताशा पथक, महिला फुगडी पथक तसेच आकर्षक शोभायात्रा हे यंदाच्या उत्सवाचे विशेष आकर्षण ठरणार आहे. रथयात्रेच्या मार्गात तरुण मंडळ आणि संस्थान मार्फत प्रसाद वाटप केले जाणार आहे.

ढोल–ताशांचा निनाद, लेझीमच्या तालावर थिरकणारी पावले, पारंपरिक वेशभूषेतील महिला फुगडी पथक आणि भक्तिभावाने सहभागी होणाऱ्या समाजबांधवांच्या उपस्थितीने पालखी मिरवणुकीला आगळेवेगळे वैभव प्राप्त होणार आहे. महर्षी मार्कंडेय महामुनींच्या रथाचे दर्शन घेण्यासाठी आणि या मंगल सोहळ्याचा साक्षीदार होण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे.

उत्सवाची माहिती महर्षी मार्कंडेय देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष श्री. श्रीकांत छिंदम आणि उपाध्यक्ष श्री. मनोज दुलम यांनी दिली. नारळी पौर्णिमा उत्सवाच्या माध्यमातून धार्मिक श्रद्धेसोबतच समाजातील एकोपा, परस्पर सहकार्य आणि सांस्कृतिक परंपरांचे जतन करण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. समाजातील प्रत्येक घटकाने या उत्सवात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून उत्सवाचे वैभव वाढवावे, असे आवाहन त्यांनी केले.

उत्सवाच्या नियोजनासाठी श्री. प्रकाश कोटा, सचिव आणि श्री. अजय म्याना, खजिनदार यांचे सहकार्य लाभत आहे. तसेच पंच कमेटी पद्मशाली ज्ञाती समाजाचे अध्यक्ष श्री. संजय वल्लाकट्टी, सचिव श्री. विनायक मच्चा आणि खजिनदार श्री. शंकर येमुल हेही उत्सवाच्या आयोजनात सक्रिय सहभाग घेत आहेत.

पद्मशाली विद्या प्रसारक मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष अशोक सब्बन, उपाध्यक्ष श्री. शंकर सामलेटी, सचिव श्री. विनायक गुडेवार यांच्या सहकार्यानेही उत्सवाचे नियोजन करण्यात आले आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### सारडा महाविद्यालयाच्या कृष्णा गायकेची रेड रन मॅरेथॉन स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी



अहिल्यानगर - सिव्हिल हॉस्पिटल अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ''रेड रन मॅरेथॉन'' स्पर्धेत पेमराज सारडा महाविद्यालयाचा खेळाडू कृष्णा गायके याने प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले.या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर त्याची राज्यस्तरीय रेड रन मॅरेथॉन स्पर्धेसाठी निवड झाली. कोल्हापूर येथे झालेल्या राज्यस्तरीय रेड रन मॅरेथॉन स्पर्धेत कृष्णा गायके याने उत्कृष्ट कामगिरी करत चौथा क्रमांक मिळविला. राज्यस्तरीय स्पर्धे तील त्याच्या कामगिरीबद्दल त्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. या स्पर्धे तील उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्याला दहा हजार रुपये रोख पारितोषिक, मेडल व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. त्याच्या या यशाबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष ॲड.अनंत फडणीस,मानद सचिव संजय जोशी,कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी,कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी, उपप्राचार्य प्रा.मिलिंद देशपांडे, प्रा.गिरीश पाखरे, पर्यवेक्षक डॉ. सुजित कुमावत,प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांनी कृष्णा गायकेच्या यशाचे कौतुक केले. कृष्णा गायकेच्या या यशामुळे पेमराज सारडा महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला.कृष्णा गायके याला प्रा.संजय साठे, अक्षय कर्डिले यांचे मार्गदर्शन लाभले.

### शुक्रवारी तुकाराम मुंढेंच्या कर्तव्यनिष्ठेला 'तिरंगा धारणालय सलाम'!

अहिल्यानगर - नागरिकांच्या करातून वेतन घेऊनही जनतेची कामे प्रलंबित ठेवणाऱ्या, कायद्याऐवजी मनमानीला प्राधान्य देणाऱ्या आणि निर्णयांची जबाबदारी टाळणाऱ्या प्रशासकीय प्रवृत्तीविरोधात पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसद यांच्या वतीने शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात व्यवस्थेतील निष्क्रिय प्रवृत्तीवर भाष्य करण्यासाठी 'पगारहमीअक्कलमारी नोकरशाही' हा जनजागृतीपर शब्दप्रयोग जाहीर करण्यात आला आहे. संघटनांच्या मते, 'पगारहमी' म्हणजे जनसेवेचा परिणाम काहीही असला तरी वेतन आणि पदसुरक्षा निश्चित असणे; तर 'अक्कलमारी' म्हणजे ज्ञान, कायदा आणि उपलब्ध विवेकाचा लोकहितासाठी वापर न करता फाईलशाही, टोलवाटोलवी आणि मनमानीला प्राधान्य देणे. या प्रवृत्तीमुळे सामान्य नागरिकांना वेळेत न्याय, पारदर्शक सेवा आणि भ्रष्टाचारमुक्त प्रशासन मिळण्यात अडथळे निर्माण होत असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे.भारतीय प्रशासनातील प्रत्येक अधिकारी भ्रष्ट किंवा अकार्यक्षम नाही. अनेक अधिकारी प्रामाणिकपणे आणि लोकहिताची जाणीव ठेवून काम करीत आहेत. मात्र, संपूर्ण व्यवस्थेचा एकत्रित परिणाम सामान्य जनतेला अपेक्षित असलेल्या प्रभावी, पारदर्शक आणि उत्तरदायी प्रशासनाच्या दृष्टीने अपुरा ठरत असल्याचे संघटनांनी म्हटले आहे. त्यामुळे हे आंदोलन भ्रष्टाचार, अनागोंदी, निष्क्रियता आणि जनउत्तरदायित्वशून्य प्रशासकीय वृत्तीविरोधात असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

# एकाच ठिकाणी ५ लाख २५ हजार ५११ भाविकांनी ''वंदे मातरम्''चे सामूहिक गायन करून विश्वविक्रम प्रस्थापित केला



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** एकाच ठिकाणी ५ लाख २५ हजार ५११ भाविकांनी एकाच वेळी ''वंदे मातरम्''चे सामूहिक गायन करून नवा विश्वविक्रम प्रस्थापित केला. महाराष्ट्रातील अहिल्यानगर येथील श्री क्षेत्र धनगरवाडी येथे संत योगीराज सद्गुरु श्री गंगागिरी महाराज यांच्या १७९व्या अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. २५ ऑगस्ट २०२६ रोजी श्रीक्षेत्र सरला बेटचे विद्यमान मठाधिपती महंत श्री रामगिरी महाराज यांच्या आयोजनाखाली एकूण ५ लाख २५ हजार ५११ भाविकांनी एकाच वेळी ''वंदे मातरम्''चे सामूहिक गायन करून नवा विश्वविक्रम प्रस्थापित केला.

यापूर्वीचा विश्वविक्रम ''वंदे मातरम्''चे एकाच वेळी सर्वाधिक लोकांनी केलेल्या सामूहिक गायनाचा यापूर्वीचा विश्वविक्रम १ लाख ४ हजार ६३७ सहभागींच्या नावावर होता. हा विक्रम १२ जानेवारी २०१० रोजी पुणे येथे द आर्ट ऑफ लिव्हिंग फाउंडेशनने आयोजित केलेल्या ''अंतर्नाद'' या संगीत कार्यक्रमात नोंदविण्यात आला होता.

**विश्वविक्रमाचे प्रमाणपत्र प्रदान**

या विश्वविक्रमाचे प्रमाणपत्र श्रीक्षेत्र सरला बेटचे मठाधिपती महंत श्री रामगिरी महाराज यांना विनर्स बुक ऑफ रेकॉर्ड्स वर्ल्डचे अध्यक्ष आणि १८४ विश्वविक्रम करणारे पहिले भारतीय डॉ. दीपक हरके, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

मिस इंडिया आणि विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सच्या चेअरमन डॉ. ईशा अग्रवाल यांनीही सरला बेटचे मठाधिपती महंत श्री रामगिरी महाराज यांचे या ऐतिहासिक कामगिरीबद्दल अभिनंदन केले.

या कार्यक्रमास अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. यामध्ये श्रीक्षेत्र सरला बेटचे विश्वस्त व मार्गदर्शक मधु महाराज, अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, आमदार विवेक कोल्हे, कोपरगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार आशुतोष अशोकराव काळे, वैजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार रमेश बोरनारे, संगमनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमोल खताळे, नेवासा विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार विठ्ठल लंघे तसेच काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांचा समावेश होता.

## श्रीकांत ढाकणे यांच्या वाढदिवसानिमित्त ढाकणे शैक्षणिक संकुलात विविध सुविधांचे उद्घाटन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शेवगाव–** केदारेश्वर ग्रामीण विकास प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्रीकांत एकनाथराव ढाकणे यांच्या वाढदिवसानिमित्त ढाकणे शैक्षणिक संकुल, शेवगाव येथे विविध शैक्षणिक व पायाभूत सुविधांच्या उद्घाटनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

यावेळी अद्ययावत सेमिनार हॉल व ४५ केव्हीए जनरेटर सुविधेचे उद्घाटन करण्यात आले. तसेच ढाकणे शैक्षणिक संकुलातील नवीन एमसीए () अभ्यासक्रमाच्या नवीन कार्यालयाचेही उद्घाटन करण्यात आले. या सुविधांमुळे विद्यार्थ्यांना आधुनिक शैक्षणिक वातावरण, अखंडित वीजपुरवठा तसेच अधिक सक्षम प्रशासकीय सुविधा उपलब्ध होणार आहेत.

श्रीकांत ढाकणे यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा कार्यक्रम न ठेवता विद्यार्थी व संस्थेच्या विकासाला उपयुक्त ठरणाऱ्या विविध सुविधांचे उद्घाटन करून शैक्षणिक बांधिलकी जपण्यात आली, ही बाब विशेष उल्लेखनीय ठरली.

यावेळी अध्यक्ष डॉ. एकनाथराव ढाकणे, विश्वस्त हृषीकेश ढाकणे, प्रा. अंबादास डोंगरे, प्रा. महेश मरकड, प्रा. प्रवीण नागरगोजे, प्रा. सुनील औताडे, प्रा. संतोष आंधळे, प्रा. जगदीश दळे यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. नवीन सेमिनार हॉल, ४५ केव्हीए जनरेटर आणि एमसीए अभ्यासक्रमाच्या नवीन कार्यालयामुळे ढाकणे शैक्षणिक संकुलाच्या शैक्षणिक व प्रशासकीय सुविधांमध्ये महत्त्वपूर्ण भर पडली असून, त्याचा लाभ विद्यार्थ्यांना होणार आहे.

# शिक्षणाला तंत्रज्ञानाची जोड, स्वच्छतेला संस्कारांची साथ!

### रोटरी क्लब ऑफ अहमदनगर इंटिग्रिटीकडून श्री समर्थ प्रशालेला इंटरॅक्टिव्ह टीव्ही पॅनल व स्वच्छता साहित्य भेट



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–**''समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून गरजूंपर्यंत मदत पोहोचविता येते, याचे समाधान काम करण्याची नवी ऊर्जा व प्रेरणा देते. श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे कार्य शिक्षणाभिमुख असल्याने प्रशालेला उपयुक्त साहित्य देताना मनस्वी आनंद होत आहे,'' असे प्रतिपादन रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. सईद शेख यांनी केले.

रोटरी क्लब ऑफ अहमदनगर इंटिग्रिटीच्या वतीने श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेला इंटरॅक्टिव्ह टीव्ही पॅनल, हात धुण्यासाठी स्टील वॉश बेसिन तसेच ओला व सुका कचरा संकलनासाठी प्लास्टिक ड्रम भेट देण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाधारित शिक्षणासोबतच स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाचे संस्कार मिळण्यास मदत होणार आहे. रोटरीच्या विविध उपक्रमांमध्ये डिजिटल शिक्षणाला दिले जाणारे महत्त्व यापूर्वीही दिसून आले आहे.

यावेळी डॉ. सईद शेख, निखिल कुलकर्णी, ॲड. ज्योत्स्ना ससाणे, शुभश्री पटनाईक, प्रियंका चिखले तसेच संस्थेचे व्हाईस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, सचिव सुरेश क्षीरसागर, शालेय समिती चेअरमन ॲड. किशोर देशपांडे व पर्यवेक्षक लक्ष्मीकांत कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रशालेच्या प्राचार्या सौ.वसुधा जोशी यांच्या नियोजनात संपन्न झालेल्या सोहळ्यामध्ये फुलांच्या वर्षावात व ढोल-ताशांच्या गजरात मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्रमुख अतिथींच्या हस्ते श्री समर्थ प्रतिमापूजन करण्यात आले. समर्थ सभागृहात झालेल्या कार्यक्रमात मान्यवरांचा शाल व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

पर्यवेक्षक कुलकर्णी यांनी प्रास्ताविकात सांगितले, ''शाळेच्या प्रगतीसोबत विद्यार्थ्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अशा सहकार्याची आवश्यकता असते. रोटरी क्लबने दिलेल्या भेटवस्तू विद्यार्थ्यांच्या प्रगतीला निश्चितच नवी दिशा देतील.''

प्रियंका चिखले यांनी प्रशालेसोबत यापुढेही विविध उपक्रमांत सहकार्य करण्याची भावना व्यक्त केली. निखिल कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांनी मिळालेल्या सुविधांचा योग्य उपयोग करून चांगल्या सवयी आत्मसात करण्याचे आवाहन केले. सचिव सुरेश क्षीरसागर यांनी रोटरी क्लबची मदत शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अमोल बागुल यांनी केले, तर आभार अस्मिता कुलकर्णी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ. अवघडे, श्री पोपट लोंढे, श्री अरुण राशिनकर तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

रेणावीकर विद्यामंदिर शाळेने पटकावला क्लासिक व्हील प्रायव्हेट लिमिटेड आणि रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर

# प्रियदर्शनी आयोजित आंतरशालेय देशभक्तीपर समूहगीत स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** क्लासिक व्हील प्रायव्हेट लिमिटेड अहिल्यानगर एमआयडीसी'' आणि ''रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनी''आयोजित आंतर शालेय देशभक्तीपर समूहगीत स्पर्धेत म.ए.सो. च्या रेणावीकर विद्यामंदिर शाळेने प्रथम क्रमांक पटकावला. ''आओ बच्चो तुम्हे दिखाये'' हे गाणे विद्यार्थ्यांनी सादर केले. अतिशय तालासुरात व तल्लीन होऊन विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. त्यामुळे शाळेला प्रथम क्रमांक प्राप्त झाला.

आपल्या सादरीकरणाने विद्यार्थ्यांनी परीक्षकांबरोबरच प्रेक्षकांची देखील मने जिंकली. संपूर्ण प्रेक्षागृह विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने भारावून गेले. देशप्रेमाने ओतप्रोत भरलेल्या एक से बढकर एक गीतांनी संपूर्ण स्पर्धेचा माहोल अतिशय संगीतमय झाला होता.

या सर्व विद्यार्थ्यांना शाळेचे संगीत शिक्षक कल्पेश अदवंत सर यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले.. शाळेच्या मुख्याध्यापिका प्रतिभा गायकवाड यांनी सर्वांचे विशेष कौतुक केले. शाळेतर्फे सततच अशा कलाविषयक उपक्रमांना सतत प्रोत्साहन दिले जाते. स्वातंत्र्यदिनानिमित्त क्लासिक व्हील प्रायव्हेट लिमिटेड, एमआयडीसी, अहिल्यानगर आणि रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनी यांच्यातर्फे दरवर्षी या स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. यावर्षी देखील नगरमधील अनेक शाळांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला. अतिशय चुरशीच्या झालेल्या या स्पर्धेत शाळेने प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# ना फ्लेक्स, ना बॅनरबाजी! ईद-ए-मिलाद निमित्त ख्वाजाजी फाउंडेशन, मुकुंदनगर तर्फे रक्तदान शिबिर





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** समाजहिताचा आदर्श संदेश देत यंदा ईद-ए-मिलाद साजरी करण्यात आली. ना फ्लेक्स, ना बॅनरबाजी... तर रक्तदानासारख्या जीवनदायी उपक्रमाला प्राधान्य देण्यात आले. या सामाजिक उपक्रमातून समाजापुढे एक सकारात्मक आदर्श निर्माण करण्यात आला.

अहिल्यानगर शहरातील मुकुंदनगर येथील ख्वाजाजी फाउंडेशनच्या वतीने ईद-ए-मिलाद निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. रक्तदान शिबिराला तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून जवळपास ४५ तरुणांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

अहिल्यानगर शहरातील राज चेंबर, कोठला येथे असलेल्या स्टार इंडिया १ न्यूज कार्यालयासमोर पार पडलेल्या या उपक्रमात साई सेवा ब्लड सेंटर (रक्तपेढी) यांनी रक्तसंकलनाची जबाबदारी पार पाडली. रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांना साई सेवा ब्लड सेंटरच्या वतीने प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी साई सेवा ब्लड सेंटर (रक्तपेढी) तर्फे ख्वाजाजी फाउंडेशन, मुकुंदनगरच्या कार्याचा विशेष सन्मान करण्यात आला. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी ख्वाजाजी फाउंडेशनच्या सदस्यांनी परिश्रम घेत कार्यक्रम उत्कृष्टरीत्या पार पाडला.रक्तदात्यांच्या सोयीसाठी अल्पहार व ची व्यवस्था करण्यात आली होती. समाजहितासाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे शहरभरातून कौतुक होत असून रक्तदानासारख्या जीवनदायी कार्यातून युवकांनी समाजापुढे एक आदर्श निर्माण केला आहे. अहिल्यानगर शहरात राज चेंबर, कोठला येथे पार पडलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून ''रक्तदान हेच श्रेष्ठ दान'' हा संदेश प्रभावीपणे पोहोचविण्यात यश आले आहे.

# प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर माळेगाव-ने येथील घेराव आंदोलन दुसऱ्या दिवशी स्थगित

### दोन बंधाऱ्यासाठी शुक्रवारी पाणी सोडणार ; उर्वरितसाठी अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव १० सप्टेंबरपर्यंत वरिष्ठांकडे सादर करण्याचे लेखी आश्वासन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पाणलोट क्षेत्रातील सात बंधारे, तलाव व नालाबंडिंग वर्षातून सहा वेळा पाण्याने समृद्ध करावेत, या मुख्य मागणीसाठी माळेगाव-ने (ता. शेवगाव) येथील शेतकरी, महिला व युवकांनी ताजनापूर लिफ्ट योजनेच्या पाण्यासाठी सुरू केलेले घेराव आंदोलन दुसऱ्या दिवशी उशिरा प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर मागे न घेता 'स्थगित' करण्यात आले आहे.

ताजनापूर लिफ्ट योजनेचे जनक ॲड. शिवाजीराव काकडे, जि.प च्या माजी सभापती हर्षदा काकडे यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी (२४ ऑगस्ट) सकाळपासून सुरू झालेल्या या आंदोलनात शेतकऱ्यांनी संपूर्ण रात्र कार्यालय परिसरातच व्यतीत केली. तेथेच स्वयंपाक करून जेवण केले. रात्रभर अभंग, हरिपाठ आणि भजनाच्या माध्यमातून आंदोलनाची धग कायम ठेवली गेली. मंगळवारी सकाळी आंदोलकांनी प्रथम उपविभागीय अधिकारी कार्यालय परिसराची स्वच्छता करत प्रशासनाला एक अनोखा व सनदशीर संदेश देत दिवसभर कार्यालय परिसरात ठाण मांडले. दुपारचे जेवण देखील तेथेच करत भजने व अभंग गायली.

आंदोलनाची वाढती धग आणि शेतकऱ्यांचा आक्रमक पवित्रा पाहून अहिल्यानगर येथून कार्यकारी अभियंता जगदीश पाटील आंदोलनस्थळी पोहचले. आंदोलक आणि प्रशासनांमध्ये



काही चर्चेच्या फेऱ्या झाल्यानंतर जलसंपदा विभागाने अखेर प्रशासकीय पातळीवर महत्त्वाचा निर्णय घेतला. त्यानुसार यांत्रिकी विभागाचे अपुर्ण काम पूर्ण करून येत्या शुक्रवारी (२८ ऑगस्ट) पूर्वीच्या मंजुरीतील दोन बंधाऱ्यात पाणी सोडले जाईल आणि उर्वरित पाच पाणलोट क्षेत्राच्या सर्वेक्षण कामासाठी ताजनापूर उपसा सिंचन योजनेतील फेरनियोजनातील शिल्लक पाण्याचा वापर करून अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव १० सप्टेंबर २०२६ पर्यंत वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करण्यात येईल. सर्वेक्षणाच्या कामाला सक्षम स्तरावरून मंजुरी घेऊन निविदा प्रक्रिया पूर्ण केली जाईल. कार्यारंभ आदेश मिळाल्यानंतरच्या तीन महिन्यांच्या आत हे सर्वेक्षण काम पूर्ण केले जाईल. सदर सर्वेक्षणाचा सविस्तर अहवाल प्राप्त झाल्यानंतर या योजनेचा डीपीआर पुढील मंजुरीसाठी शासनाकडे सादर करण्यात येईल असे लेखी आश्वासन अहिल्यानगर मध्यम प्रकल्प विभागाचे कार्यकारी अभियंता जगदीश पाटील यांनी दिले.

प्रशासनाकडून निश्चित वेळेची मर्यादा आखून देत लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन पूर्णपणे मागे न घेता केवळ 'स्थगित' करत असल्याची घोषणा ॲड.काकडे यांनी आंदोलकांच्या वतीने केली. यावेळी 'ताजनापूर'चे उपविभागीय अधिकारी श्रीहरी कुलकर्णी, कार्यकारी अभियंता (यांत्रिकी विभाग) दत्तात्रय गुळमकर, उपअभियंता (यांत्रिकी विभाग) अविनाश आव्हाड व इतर कर्मचाऱ्यांसह ज्येष्ठ नेते जगन्नाथदादा गावडे, लक्ष्मण गवळी, देविदास गिऱ्हे, भाऊसाहेब सातपुते, अशोक ढाकणे, रामजी पोटफोडे, भारत भालेराव, आणि माळेगाव ने व तालुक्यातील विविध गावातील शेतकरी, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आंदोलन मागे नाही, फक्त स्थगित**

प्रशासनाकडून निश्चित मुदतीचे लेखी आश्वासन मिळाल्यानंतर हे आंदोलन पूर्णपणे मागे न घेता केवळ स्थगित करण्यात आले आहे. माळेगावच्या शेवटच्या पाणलोट क्षेत्रात पाणी येई पर्यंत पाठपुरावा करतच राहणार

**ॲड.शिवाजीराव काकडे**

**यांत्रिकी विभागाची जोडणी करून ताजनापूर**

योजनेतून येत्या शुक्रवारी (ता.२८) रोजी पाणी सोडले जाईल मात्र यातुन पूर्वीच्या मंजुरीप्रमाणे दोन बंधारे भरतील. ग्रामस्थांच्या मागणीनुसार उर्वरित पाच पाणलोट क्षेत्राला पाणी देण्यासाठी नव्याने सर्वे क्षणासाठी अंदाजपत्रक मंजुरीसाठी १० सप्टेंबर २०२६ पर्यंत प्रस्ताव वरिष्ठांना सादर केला जाईल.

**जगदीश पाटील,**
कार्यकारी अभियंता,
मध्यम प्रकल्प विभाग, अहिल्यानगर.

# २८ ऑगस्टच्या मिरवणुकीत रंगणार 'कांतारा इफेक्ट'चा थरार; श्री एकदंत मित्र मंडळ व शिवराज्यकर्ते युवा प्रतिष्ठानचे खास सादरीकरण

## वराहरूप, गुलिगा देव अन् भूतकोला नृत्याचा थरार; नगरकरांमध्ये उत्सुकता

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री मार्कंडेय देवस्थान ट्रस्टच्या वतीने रक्षाबंधन व नारळी पौर्णिमेनिमित्त शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट रोजी भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाच्या मिरवणुकीचे विशेष आकर्षण ठरणार आहे ते श्री एकदंत मित्र मंडळ व शिवराज्यकर्ते युवा प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात येणारे आगळेवेगळे सांस्कृतिक सादरीकरण. दरवर्षी नवनवीन संकल्पना सादर करणाऱ्या या दोन्ही संस्थांनी यंदा 'कांतारा' चित्रपटातून प्रसिद्ध झालेल्या भूतकोला परंपरेपासून प्रेरणा घेत विशेष कलाविष्कार साकारला आहे.

वराहरूप, गुलिगा देव आणि भूतकोला नृत्याचा थरारक आविष्कार कलाकारांच्या माध्यमातून सादर करण्यात येणार आहे. आकर्षक वेशभूषा, प्रभावी रंगभूषा, पारंपरिक नृत्यशैली आणि दमदार अभिनय यामुळे मिरवणुकीतील हे सादरीकरण प्रेक्षकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे. पारंपरिक लोककला आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अनोखा मिलाफ या सादरीकरणातून पाहायला मिळणार आहे.

या कलाविष्काराला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यात आली असून एलईडी स्क्रीन, आकर्षक दृश्यफिती आणि विशेष प्रकाशयोजनेमुळे 'कांतारा इफेक्ट' अधिक प्रभावी ठरणार आहे. भूतकोला




परंपरेतील वैशिष्ट्यपूर्ण वेशभूषा, नृत्य आणि भावमुद्रांचा थरार नगरच्या रस्त्यावर अनुभवता येणार असल्याने नगरकरांमध्ये या सादरीकरणाबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

मिरवणुकीचा प्रारंभ श्री मार्कंडेय मंदिर, गांधी मैदान येथून होणार असून चितळे रोड, चौपाटी कारंजा, दिल्ली गेट, जंगूभाई तालीम, नवरंग व्यायामशाळा, बागडपट्टी मार्गे पुन्हा श्री मार्कंडेय मंदिर असा मिरवणुकीचा मार्ग राहणार आहे.

कलाकारांनी या सादरीकरणासाठी विशेष मेहनत घेतली असून, पारंपरिक कलेला आधुनिक सादरीकरणाची जोड देत नगरकरांसमोर वेगळा अनुभव निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या नागरिकांना हा कलाविष्कार नक्कीच लक्षवेधी ठरणार असून, कुटुंबासह उपस्थित राहून या 'कांतारा इफेक्ट'चा थरार अनुभवावा आणि कलाकारांचा उत्साह वाढवावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी श्री एकदंत मित्र मंडळ व शिवराज्यकर्ते युवा प्रतिष्ठानचे ऋषीकेश सामल, ओंकार बुरगुल, अमर सादुल, यश सामल, माधव उडता, रोहन सामल, वरद अन्नलदास, ओंकार अन्नलदास, कार्तिक गज्जम, शुभम कारामपुरी, महावीर कोंड्याल, साई सामल, आकाश हरबा, तनिष्क सिरसूल, शिवा कोंडा, गौरव कन्ना, विनीत इराबत्तीन, अक्षय बुरला, विपुल आडेप, तनिष्क कोंडा, ईश्वर कैरमकोंडा, वेदांत देशपांडे, बालाजी श्रीराम, दर्शन कैरमकोंडा, संतोष उषाकोयल, श्रीकांत गज्जम तसेच महिला मंडळ आदी प्रयत्नशील आहेत.

शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट रोजी नगरकरांनी मोठ्या संख्येने मिरवणुकीत सहभागी होऊन या अनोख्या सादरीकरणाचा आनंद घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# राज्य टेनिस क्रिकेट स्पर्धेत अहिल्यानगरच्या मुलींची बाजी

## अंतिम सामन्यात जळगाववर दोन षटके राखून मात; सावित्रीबाई फुले विद्यालयाच्या सात खेळाडूंचा विजयी संघात सहभाग । संघाला विजेतेपद; उत्तर प्रदेश येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी संघाची निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र यांच्या वतीने राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या मैदानावर सुरू असलेल्या राज्य अजिंक्यपद टेनिस क्रिकेट स्पर्धेत अहिल्यानगरच्या मुलींच्या संघाने दमदार कामगिरी करत राज्य अजिंक्यपदाचे प्रथम क्रमांकाचे विजेतेपद पटकाविले. उपांत्य फेरीत मुंबईच्या संघाचा पराभव केल्यानंतर अंतिम सामन्यात जळगावच्या संघावर दोन षटके राखून मात करत अहिल्यानगरच्या संघाने विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

या विजयी संघात सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयातील तब्बल सात खेळाडूंचा समावेश होता. त्यामुळे विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. राज्य अजिंक्यपद स्पर्धेत अहिल्यानगरच्या संघाने सुरुवातीपासूनच उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन केले. उपांत्य फेरीतील सामन्यात अहिल्यानगरच्या खेळाडूंनी मुंबईच्या संघाला पराभूत करून अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामन्यात जळगावच्या संघाविरुद्धही अहिल्यानगरच्या खेळाडूंनी फलंदाजी आणि गोलंदाजीत प्रभावी कामगिरी केली. अखेर जळगावचा दोन षटके राखून पराभव करत अहिल्यानगर संघाने राज्य अजिंक्यपद पटकाविले.



संघाच्या या विजयात कर्णधार नशरा सय्यद हिचे नेतृत्व महत्त्वपूर्ण ठरले. तिच्यासह राशी पवार, अमृता ढगे, धनश्री पवार, प्रणाली पानसंबळ, भक्ती गाडे, श्रावणी अडसुरे, आदिती ढोकणे आणि लक्ष्मीप्रिया म्हसे यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. अहिल्यानगरच्या विजयी कामगिरीमध्ये खेळाडूंच्या वैयक्तिक कामगिरीलाही विशेष दाद मिळाली. संघाची खेळाडू राशी पवार हिला स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट गोलंदाज म्हणून गौरविण्यात आले. तिच्या प्रभावी गोलंदाजीमुळे संघाला महत्त्वाच्या सामन्यांमध्ये निर्णायक फायदा झाला. तसेच अहिल्यानगरचीच अमृता ढगे हिला स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरविण्यात आले. फलंदाजी, गोलंदाजी तसेच सांघिक खेळातील योगदानामुळे तिने स्पर्धेत विशेष छाप पाडली.

राज्य अजिंक्यपद पटकावणाऱ्या या खेळाडूंचे सावित्रीबाई फुले शिक्षण मंडळाचे अध्यक्ष तथा महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, शिक्षण मंडळाचे सचिव महानंदजी माने, खजिनदार महेश घाडगे, विद्यालयाचे प्राचार्य अरुणजी तुपविहीरे, उपप्राचार्य बाळासाहेब डोंगरे, पर्यवेक्षक मनोज बावा, प्रा. जितेंद्र मेटकर, राहुरी कृषी विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी व क्रीडा अधिकारी डॉ. विलास आवारी, सहाय्यक कुलसचिव वैभव बारटक्के आदींनी अभिनंदन केले.

आगामी काळात उत्तर प्रदेशातील मथुरा येथे होणाऱ्या राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी सर्व विजयी खेळाडूंना मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. खेळाडूंना क्रीडाशिक्षक घनश्याम सानप तसेच एनसीसी प्रमुख संतोष जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. अहिल्यानगरच्या मुलींनी राज्यस्तरीय स्पर्धेत मिळविलेल्या या यशामुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# मंगळागौर महिला उत्सवात रंगणार महिलांच्या कलाविष्काराचा जल्लोष

## मानसी डान्स स्टुडिओतर्फे १ सप्टेंबरला आयोजन; विविध खेळ, गाणी–नृत्यांसह लकी ड्रॉमध्ये पैठणीसह आकर्षक बक्षिसे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** येथील मानसी डान्स स्टुडिओच्या वतीने मंगळवार, दि. १ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ ते रात्री ९ या वेळेत माऊली सभागृह, माऊली संकुल, सावेडी रोड, अहिल्यानगर येथे मंगळागौर महिला उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून अंजली नूतलयाच्या संचालिका सुरेखा डावरे, उपअधीक्षक, भूमी अभिलेख, अहिल्यानगर अविनाश मिसाळ, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, विद्युत महावितरण कंपनी भास्कर कोले, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन, फिजिओथेरपी कॉलेजचे प्राचार्य डॉ. शाम गणवीर तसेच डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन ,फिजिओथेरपी कॉलेजच्या उपप्राचार्य सुवर्णा गणवीर उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमात राष्ट्रीय तबलावादक मास्टर गुलाब नेटके, प्रसिद्ध गायिका गायत्री कुलकर्णी, निलेश महाजन आणि डॉ. शैलेंद्र खंडागळे गायन सादर करणार आहेत. विनायक कसबेकर आणि डॉ. प्राजक्ता सावेडकर निवेदन करणार आहेत.

या कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या भगिनींसाठी आकर्षक लकी ड्रॉचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्य प्रायोजक सुविधा मार्केट यांच्याकडून एक पैठणीचे बक्षीस, तर पद्मसिद्ध ट्रेडर्स यांच्याकडून पाच बक्षिसे देण्यात येणार आहेत. तसेच सहप्रायोजक डॉ. काशीद हॉस्पिटल, 'मी राजहंस' लर्निंग डेव्हलपमेंट अँड थेरपी सेंटर फॉर चिल्ड्रेन, परिहार व्यसनमुक्ती पुनर्वसन आणि मानसिक आरोग्य केंद्र, 'ब्राईट अँड व्हाईट' डेंटल क्लिनिक, महादेव इंजिनीअर्स अँड गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर, हॉटेल सह्याद्री पॅलेस आणि 'ट्रिपवर्स क्युरेशन' यांच्याकडून प्रत्येकी एक लकी ड्रॉ बक्षीस दिले जाणार आहे.

मंगळागौर प्रशिक्षिका मानसी प्रणेश गायकवाड आणि प्रतिभा देठे यांनी शिबिरामध्ये महिलांना मंगळागौरीतील विविध खेळ, गाणी व नृत्याचे प्रशिक्षण दिले आहे. या प्रशिक्षण घेतलेल्या महिलांकडून मंगळागौर महिला उत्सवात विविध कलाविष्कार सादर करण्यात येणार आहेत. त्यामुळे महिलांच्या पारंपरिक कला, संस्कृती, उत्साह आणि मनोरंजनाचा सुंदर संगम या कार्यक्रमातून अनुभवता येणार आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सीमा देशमुख, अर्चना शिंदे, कल्पना कांबळे, इंजि. संजीव घोडके, इंजि. किरण साळवे, बाळासाहेब शिंदे, डॉ. सुशील तुरुकमाने, हर्षवर्धन कांबळे, हर्षत भिंगारदिवे आणि राजवर्धन कांबळे परिश्रम घेत आहेत.

### अहिल्यानगर नामांतराची प्रभावी अंमलबजावणी न झाल्यास

# प्रशासनाला जाग आणण्यासाठी जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींना निवेदन देणार - सचिन कोळपे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**कोपरगाव–** अहिल्यानगर नामांतराची प्रभावी अंमलबजावणी न झाल्यास प्रशासनाला जाग आणण्यासाठी जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींना निवेदन देणार असल्याचे प्रतिपादन महाराणी अहिल्यादेवी समाज प्रबोधन मंच महाराष्ट्र राज्य, मुंबई चे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष सचिन मिरानामदेव कोळपे यांनी केले आहे.महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मस्थान असणाऱ्या चोंडी येथे ३१ मे २०२३ रोजी आपल्या जिल्ह्याचे नाव अहिल्यानगर करण्याच्या ऐतिहासिक निर्णयाची घोषणा केली होती.त्यानंतर शासनाने या संदर्भातील शासन आदेश देखील काढला होता मात्र ३ वर्षे होऊन गेले तरी आपल्या जिल्ह्यामध्ये शासनस्तरावर अहिल्यानगर नामांतराची अंमलबजावणी झालेली दिसून येत नाही.



ही अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी मा.जिल्हाधिकारी साहेब,सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद तसेच सर्वच शासकीय विभागांना लोकप्रतिनिधी मार्फत आदेश होणे आवश्यक आहे.तसेच संबंधित अंमलबजावणी साठी आवश्यक तेथे शासनाला निधी देखील देण्याची तयारी दाखवावी लागणार आहे.कागदपत्रांमधील बदलांना लागणारा वेळ आपण समजु शकतो पण सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने एकाही जुन्या फलकावर नाव बदललेले दिसत नाही, ग्रामपंचायती , जिल्हा परिषद शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र यावर देखील जुनाच उल्लेख आहे.सर्वात मोठी शोकांतिका अशी आहे लोकप्रतिनिधींनी वास्तव्यास असलेल्या गावांमधील शासकीय संसाधनांच्या नावात बदल केलेला नाही.आपल्या अहिल्यानगर च्या जडणघडणीत पतसंस्था तसेच विविध कार्यकारी सेवा सोसायट्यांचे मोठे योगदान राहिले आहे त्यांनी देखील नामानतरासाठी पुढे आले पाहिजे.या बाबतीत योग्य त्या उपाययोजना दिसत नसल्याने महाराणी अहिल्यादेवी समाज प्रबोधन मंच महाराष्ट्र राज्य, मुंबई च्या माध्यमातून जिल्हाभर या बाबतीत जागृती निर्माण केली जाणार आहे.या बाबतीत सर्व लोकप्रतिनिधी, अधिकारी, पदाधिकारी यांनी नामांतर अंमलबजावणी साठी पुढाकार घ्यावा हे आवाहन कोळपे यांनी केले आहे.

# जागतिक छायाचित्रण दिनानिमित्त निसर्गातील छाया–कृती उपक्रम उत्साहात साजरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** १९ऑगस्ट रोजी जागतिक छायाचित्रण दिनानिमित्त सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी 'निसर्गातील छाया–कृती' या आगळ्यावेगळ्या छायाचित्रण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत निसर्गातील विविध सुंदर, मनमोहक आणि अनमोल क्षण आपल्या कॅमेऱ्यात टिपले. फुले, पाने, आकाश, पक्षी, झाडे तसेच निसर्गातील विविध रमणीय दृश्यांचे विद्यार्थ्यांनी कलात्मक पद्धतीने छायाचित्रण केले.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या निरीक्षणशक्ती, सर्जनशीलता आणि कलात्मक दृष्टीला वाव मिळाला. यामध्ये इयत्ता सहावी मधून प्रथम क्रमांक आयुष क्षेत्रे द्वितीय क्रमांक रियांश जितेंद्र लालवानी, इयत्ता सातवी प्रथम क्रमांक स्वराली तांदळे व द्वितीय क्रमांक विधिराज सेंगल, इयत्ता आठवी प्रथम क्रमांक प्रांजल यादव व द्वितीय क्रमांक उदय देवढे,इयत्ता नववी प्रथम क्रमांक सानवी मदने व द्वितीय क्रमांक आत्मजा वैद्य तसेच इयत्ता दहावी प्रथम क्रमांक वेदश्री जोशी द्वितीय क्रमांक सार्थक बेद्रे या विद्यार्थ्यांनी निसर्गातील अनमोल घटकांची छायाचित्रे टिपली व पारितोषिक मिळवले.

या उपक्रमाचे परीक्षण श्री. अमोल धोपावकर सर व सौ. दिव्या पोखरणा मॅडम यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या छायाचित्रांचे बारकाईने परीक्षण करून त्यांच्या कलागुणांचे कौतुक केले.




निसर्गाकडे केवळ पाहण्याची नव्हे, तर त्यातील सौंदर्य अनुभवून ते कॅमेऱ्यात जतन करण्याची दृष्टी विद्यार्थ्यांना या उपक्रमातून मिळाली. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा उपक्रम अत्यंत आनंददायी आणि संस्मरणीय ठरला. शाळेच्या प्राचार्या गीता तांबे मॅडम यांनी निसर्गावरील प्रेम व्यक्त करत निसर्गातून मिळणारा हा आनंद कुठेही विकत मिळत नाही म्हणून या निसर्गाचे विविध प्रकारे जतन करावे असे मत स्पष्ट केले या कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. या उपक्रमास संस्थेचे अध्यक्ष श्री. राम मेंघानी ,उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी ,सचिव गोपाल भागवानी,खजिनदार दामोदर माखिजा,विश्वस्त महेश मध्यान ,सुरेश हिरानंदानी, राजकुमार गुरुनानी ,हरेश मध्यान उपस्थित होते.

# जिल्हा प्रशासनाच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद

## डीजेमुक्त ईद–ए–मिलाद उत्साहात साजरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी केलेल्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत शहरातील मुस्लिम बांधवांनी मोहम्मद पैगंबर जयंती अर्थात ईद–ए–मिलादचा उत्सव डीजेध्वनि प्रदूषणमुक्त, शांततापूर्ण आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा केला.

मोहम्मद पैगंबर यांनी जगाला शांतता, बंधुभाव, माणुसकी आणि सर्व धर्मांचा आदर करण्याचा संदेश दिला. या विचारांचे अनुकरण करत मुस्लिम बांधवांनी यंदाच्या ईद–ए–मिलाद उत्सवादरम्यान ध्वनिप्रदूषण करणाऱ्या डीजे



ध्वनिक्षेपकांचा वापर टाळला. त्याऐवजी पारंपरिक वाद्यांचा वापर करून उत्सव साजरा करण्यात आला.

ईद–ए–मिलादच्या मिरवणुकीदरम्यान पर्यावरण संवर्धन, शांतता आणि जातीय सलोख्याचा संदेश देण्यात आला. जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासनाने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत डीजेमुक्त उत्सव साजरा करण्याचा घेतलेला निर्णय सामाजिक बांधिलकीचे उदाहरण ठरला आहे.

ध्वनिप्रदूषण टाळत शांततेत आणि उत्साहात ईद–ए–मिलाद साजरी केल्याबद्दल मुस्लिम समाजाच्या या सकारात्मक भूमिकेचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. जिल्हा प्रशासनाच्या आवाहनाला मिळालेला हा प्रतिसाद अहिल्यानगरच्या सामाजिक सलोखा आणि सर्वधर्मसमभावाच्या परंपरेला बळ देणारा ठरला आहे.

(पान १ वरून)

# एलसीबीचे तत्कालीन पीआय कबाडींची बदलीविरोधातील याचिका 'मॅट'ने फेटाळली

न्यायाधिकरणात (मॅट): धाव घेतली. या याचिकेत कबाडींनी पोलीस अधीक्षक व एलसीबीचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांना उत्तरवादी केले होते. या याचिकेवर न्यायमूर्ती विनय कोरगावकर यांच्यासमोर सुनावणी होऊन त्यांनी एसपी सुदर्शन यांनी घेतलेला बदलीचा निर्णय कायम ठेवला व कबाडींची याचिका फेटाळून लावली. आज, दिनांक २७ रोजी याचिकेवर अंतिम निर्णय देण्यात आला.

# पारनेर व नगर तालुक्यात दहशत माजवणारी शिंदे टोळी तडीपार

अनिकेत शशिकांत गवळी (सर्व रा. शहाजापूर, ता. पारनेर) या तिघांना एका वर्षासाठी संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यातून तडीपार केले आहे.

# शिक्षकांच्या रिक्त पदांवरून खा. नीलेश लंके आक्रमक

खुलासा द्यावा, अशी मागणी लंके यांनी केली आहे. तसेच शिक्षकांना अध्यापनाशी थेट संबंध नसलेल्या अशैक्षणिक कामांपासून मुक्त करावे, अत्यावश्यक शासकीय कामांसाठी पर्यायी प्रशासकीय व्यवस्था निर्माण करावी आणि शिक्षकांची कमतरता असलेल्या शाळांमध्ये तात्पुरती शिक्षक व्यवस्था करून विद्यार्थ्यांचे नुकसान तातडीने थांबवावे, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

३१ ऑगस्टपर्यंत निर्णय, अन्यथा उपोषण

या प्रश्नावर प्रशासनाने अपेक्षित गांभीर्याने कार्यवाही न केल्याने आंदोलनाचा निर्णय घेतल्याचे खासदार लंके यांनी पत्रात नमूद केले आहे. ३१ ऑगस्टपर्यंत ठोस निर्णय व लेखी कृती आराखडा न मिळाल्यास १ सप्टेंबरपासून जिल्हा परिषद आवारात उपोषण करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला आहे.

प्रत्येक विद्यार्थ्याला आवश्यक शिक्षक मिळाला पाहिजे, प्रत्येक शिक्षकाला अध्यापनासाठी पुरेसा वेळ मिळाला पाहिजे आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीस जबाबदार असलेल्या प्रशासनाची उत्तरदायित्व निश्चित झाले पाहिजे, अशी भूमिका खासदार लंके यांनी मांडली आहे.

# नगरमध्ये रविवारी रंगणार 'अहिल्यानगर फॅशन रनवे २०२६'चा मेगा इव्हेंट

मेगा इव्हेंटमध्ये अहिल्या गौरव पुरस्कार आणि सरस्वती गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर बहुप्रतीक्षित प्रेग्नेंट लेडी वॉक, डॉक्टर्स वॉक, पॅरेंट ॲण्ड मी वॉक, डिझायनर फॅशन सिक्वेन्स, अहिल्यादेवींच्या विचारांवर आधारित थीम, पारंपरिक मराठमोळी नऊवारी साडी व अलंकारांचा साज असे विविध आकर्षक सिक्वेन्स सादर केले जाणार आहेत.

आई आणि तिचे बाळ, आई आणि मुलगी या नात्यांचा भावनिक बंध अधोरेखित करणाऱ्या वॉकसोबतच रुग्णसेवेत योगदान देणाऱ्या डॉक्टरांनाही फॅशन रनवेच्या माध्यमातून एक वेगळे व्यासपीठ मिळणार आहे. आधुनिक फॅशन ट्रेंडसोबतच महाराष्ट्राच्या संस्कृती आणि परंपरेचे दर्शन या कार्यक्रमातून घडणार आहे.

कार्यक्रमातील प्रत्येक सिक्वेन्ससाठी सहभागींची विशेष तयारी करून घेण्यात आली आहे. वेशभूषा, आभूषणे, फॅशन स्टाइलिंग तसेच रॅम्प वॉकसाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळाले आहे. त्यामुळे महानगरांमध्ये पाहायला मिळणारा फॅशनचा भव्य सोहळा नगरकरांना यंदा आपल्या शहरात प्रत्यक्ष अनुभवता येणार आहे.

महिला सक्षमीकरणाचा संदेश देणारा विशेष नृत्य–नाट्य आविष्कारही यावेळी सादर केला जाणार आहे. संस्कृती, टॅलेंट, फॅशन, सक्षमीकरण, आरोग्य, मनोरंजन आणि पुरस्कार यांचा सुरेख संगम एम असलेला हा महोत्सव अहिल्यानगरकरांसाठी एक अविस्मरणीय पर्वणी ठरणार आहे.

कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य असून, एंट्री पास सरस्वती हॉस्पिटल, माळीवाडा येथे उपलब्ध आहेत. जास्तीत जास्त नगरकरांनी उपस्थित राहून या भव्य सोहळ्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.